# ‘संगीत उपचार’ अभ्यासक्रम

म. टा. प्रतिनिधी, मुंबई

पं. शशांक कट्टी यांच्या सूर संजीवन म्युझिक थेरपी ट्रस्टतर्फे ‘संगीत उपचार’ पद्धतीचा प्रमाणपत्र आणि पदविका अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. या संगीतोपचाराची आणि अभ्यासक्रमाची माहिती देणारे एक विनामूल्य सेमिनार बुधवार, १२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वाजता नाडकर्णी बालकल्याण केंद्र, चित्रकार केतकर मार्ग, डहाणूकर कॉलेजच्या मागे, विलेपार्ले (पूर्व) येथे आयोजित करण्यात आले आहे. संगीतोपचाराच्या या अभ्यासक्रमाची बॅच लवकरच नाडकर्णी बालकल्याण केंद्र, विलेपार्ले (पूर्व), मुंबई येथे सुरू होणार आहे.

संधिवात, मधुमेह, उच्च रक्तदाब, पित्तविकार, अस्थमा, निद्रानाश, डिप्रेशन, काही मनोविकार इ. विविध विकारांवर शास्त्रीय संगीतावर आधारीत सुरावलींद्वारा संगीतोपचार कसे करावेत याचे प्रशिक्षण वरील अभ्यासक्रमात दिले जाईल. तसेच उच्चशिक्षित वैद्यकीय तज्ज्ञांकडून सूर संजीवन म्युझिक थेरपीच्या शास्त्राविषयी मार्गदर्शनही केले जाईल. हे अभ्यासक्रम अनुक्रमे सहा महिने आणि एका वर्षाच्या कालावधीचे असून अर्धवेळ आहेत. या अभ्यासक्रमासाठी पं. शशांक कट्टी, डॉ. संजय छाजेड, डॉ. रश्मी फडणवीस, डॉ. मनोज भाटवडेकर, डॉ. सुहास पिंगळे, संध्या खेर या तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. ‘म्युझिक थेरपी’ शिकण्यामध्ये ज्यांना रस आहे, अशांसाठी किंवा होतकरू तरुणांसाठी ही सुवर्णसंधी असून वैयक्तिकरित्या ते म्युझिक थेरपिस्ट म्हणून भविष्यकाळात काम करू शकतात. अधिक माहितीसाठी ९८२००४६९२०/९००४६७१०५५ व www.sursanjeevan.com यावर संपर्क साधावा, असे आवाहन सूर संजीवन म्युझिक थेरपी ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

## वीज अधिकारी संघटनेचे अधिवेशन

मुंबई : राज्याच्या विद्युत क्षेत्रातील महावितरण, महानिर्मिती, महापारेषण आणि सूत्रधारी (होल्डिंग) या कंपन्यांमधील अधिकारी संघटनेचे ४३ वे राज्य अधिवेशन आज, शनिवारी अलिबाग येथे सुरू होत आहे. उद्या, रविवारी त्याचा समारोप होईल.

वित्त व लेखा, मनुष्यबळ विकास, औद्योगिक संबंध, माहिती तंत्रज्ञान, वैद्यकीय, जनसंपर्क, सुरक्षा व अंमलबजावणी आणि विधी अशा अतांत्रिक अधिकाऱ्यांचे विविध प्रश्न व समस्या सोडविण्यासाठी हे अधिवेशन भरविण्यात आले आहे. अधिवेशनाचे उद्घाटन रायगड जिल्हा पोलिस अधीक्षक अनिल पारस्कर करतील. महापारेषणचे प्रभारी संचालक (वित्त) अनिल कालेकर आणि कार्यकारी संचालक (मनुष्यबळ विकास) सुगत गमरे प्रमुख पाहुणे असतील. अलिबाग येथील नागाव रोडवरील कुरुल गावातील सुरुची रिसॉर्टमध्ये हे अधिवेशन संघटनेचे अध्यक्ष विकास आढे, सरचिटणीस दिलीप शिंदे व संघटन सचिव प्रविण बागुल यांच्या नेतृत्वाखाली होत आहे.

## ग्रंथसंग्रहालयाला विशेष दर्जा

मुंबई : शतकोत्तर रौप्यमहोत्सवी वर्ष साजरे करणाऱ्या मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालयाला विशेष संग्रहालयाचा दर्जा देण्यासाठी एक समिती स्थापन करण्यात येणार आहे. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री उदय सामंत यांनी नुकतीच ही माहिती दिली. या ग्रंथसंग्रहालयास सामंत यांनी भेट दिली. त्यावेळी ते बोलत होते. या समितीचा अहवाल मिळाल्यानंतर त्या शिफारसींनुसार सरकार या ग्रंथालयाला विशेष दर्जा देईल. तसेच या ग्रंथसंग्रहालयातील दुर्मिळ ग्रंथसंपदेचे जतन व संवर्धन करून विविध विषयांतील नवीन ग्रंथ उपलब्ध होण्यासाठीची तरतूद आणि वाचकांसाठी सोयी-सुविधा उपलब्ध केल्या जातील, असेही ते म्हणाले.






## GODFREY PHILLIPS INDIA LIMITED

CIN: L16004MH1936PLC008587:
website:www.godfreyphillips.com; email: isc-gpi@modi.com

**Extract of Unaudited Standalone and Consolidated Financial Results for the Quarter and Nine Months ended December 31, 2019**

(Rs. in lakhs)

| Sl. No. | Particulars | Standalone | | | Consolidated | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | Quarter ended 31.12.2019 | Nine Months ended 31.12.2019 | Quarter ended 31.12.2018 | Quarter ended 31.12.2019 | Nine Months ended 31.12.2019 | Quarter ended 31.12.2018 |
| 1 | Total Income from Operations | 78811 | 236707 | 69017 | 79722 | 238933 | 69733 |
| 2 | Net Profit/(Loss) for the period (before Tax, Exceptional and/or Extraordinary items) | 14558 | 44973 | 11572 | 15079 | 45769 | 12021 |
| 3 | Net Profit/(Loss) for the period before tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 14558 | 44973 | 11572 | 15079 | 45769 | 12021 |
| 4 | Net Profit/(Loss) for the period after tax (after Exceptional and/or Extraordinary items) | 10943 | 33962 | 7846 | 11398 | 34611 | 8190 |
| 5 | Total Comprehensive Income for the period [Comprising Profit/(Loss) for the period (after tax) and Other Comprehensive Income (after tax)] | 10639 | 33159 | 7716 | 12466 | 34320 | 8580 |
| 6 | Equity Share Capital | 1040 | 1040 | 1040 | 1040 | 1040 | 1040 |
| 7 | Basic and Diluted Earnings per Share (of Rs.2 each) (Rs.) (*not annualised) | 21.05* | 65.32* | 15.09* | 21.92* | 66.58* | 15.76* |

Notes:

1. The above is an extract of the detailed format of Statements of Unaudited Standalone and Consolidated Financial Results for the Quarter and Nine Months ended December 31, 2019 ("These Results") filed with the Stock Exchanges under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015. These Results and this extract were reviewed by the Audit Committee and approved by the Board of Directors of the Company at the meeting held on February 7, 2020. These Results are available on the Company's website (www.godfreyphillips.com) and on the websites of National Stock Exchange of India Limited (www.nseindia.com) and BSE Limited (www.bseindia.com).
2. The Limited Review, as required under Regulation 33 of the SEBI (Listing Obligations and Disclosure Requirements) Regulations, 2015, has been completed on These Results by the Statutory Auditors, who have issued unqualified review reports and the same have been filed with the Stock Exchanges.

**Registered Office:** 'Macropolo Building', Ground Floor, Dr. Babasaheb Ambedkar Road, Lalbaug, Mumbai - 400 033.

For and on behalf of the Board
(Dr. Bina Modi)
Managing Director

Place : New Delhi
Dated : February 7, 2020


